# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. 16/10/2026

## // सुधारित गोषवारा //

प्रकरण क्र :-९५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत विविध विकासात्मक व लोककल्याणकारी घेतलेल्या कामांना मंजूरी मिळणेबाबत.

दि. 23 जानेवारी 2026 रोजीच्या शासन निर्णयान्वये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत विविध विकासात्मक व लोककल्याणकारी कामे हाती घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना व निकष निश्चित करण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-2026/प्र.क्र.12/नवि-16 (ई-1536270) अन्वये दि. 25/06/2026 रोजी प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा विषयक कामे हाती घेण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी करण्यात आली आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

1. वाचनालय सुविधा
2. प्रयोगशाळा व व्हर्च्युअल लॅब
3. खेळ व व्यायाम सुविधा
4. प्रगत प्रशिक्षण
5. सुंदर व स्वच्छ शाळा
6. पर्यावरण जतन
7. शाळांचे ब्रँडिंग

वरील बाबींची आवश्यकता व निकड, विद्यार्थ्यांची संख्या, शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याची आवश्यकता विचारात घेऊन खालील 7 शाळांची निवड करण्यात आली आहे.

निवड करण्यात आलेल्या शाळांचा तपशील

| अ.क्र. | शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | इयत्ता |
|---|---|---|---|
| 1 | काशी उर्दू शाळा क्र. 5 | 379 | 1 ते 8 |
| 2 | गोडदेव शाळा क्र. 8 | 266 | 1 ते 7 |
| 3 | घोडबंदर शाळा क्र. 9 | 244 | 1 ते 10 |
| 4 | चेणा शाळा क्र. 10 | 279 | 1 ते 10 |
| 5 | मिरे मराठी शाळा क्र. 20 | 226 | 1 ते 7 |
| 6 | नवघर शाळा क्र. 29 | 419 | 1 ते 10 |
| 7 | मिरे उर्दू शाळा क्र. 32 | 380 | 1 ते 8 |

एकूण विद्यार्थी संख्या : 2,193

Scanned with CamScanner

वरीलप्रमाणे निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | वैशिष्ट्ये | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | वाचनालय | 1) वाचनालयासाठी आवश्यक उपकरणे<br>2) प्रत्येक वर्गात एक वाचन कोपरा<br>3) जुनी, दानातून प्राप्त अथवा नवीन पुस्तके उपलब्ध करून वाचनालय समृद्ध करणे<br>4) शनिवार हा वाचन उपक्रमासाठी निश्चित करणे | रु. 28 लाख |
| 2 | प्रयोगशाळा | आधुनिक प्रयोगशाळा तसेच आभासी (व्हर्च्युअल) प्रयोगशाळा सुविधा | रु. 189.2 लाख |
| 3 | प्रगत प्रशिक्षण | 1) शिक्षकांसाठी AI प्रशिक्षण<br>2) मानसशास्त्र विषयक शिक्षक प्रशिक्षण<br>3) प्रेरणादायी (Motivational) शिक्षक कार्यशाळा<br>4) कर्मयोगी व दीक्षा ॲपद्वारे उपलब्ध असलेल्या मोफत ऑनलाइन प्रशिक्षणाचा उपयोग | रु. 4.80 लाख |
| 4 | खेळ व व्यायाम | इनडोअर खेळ, वैयक्तिक व सांघिक खेळ, कवायत तसेच शारीरिक तंदुरुस्ती व स्नायू विकासासाठी आवश्यक व्यायाम साहित्य | रु. 21 लाख |
| 5 | शाळांचे ब्रँडिंग | 1) "माझी शाळा, माझा अभिमान" उपक्रम<br>2) "आमची शाळा, आमचा अभिमान" उपक्रम<br>3) शाळांच्या गुणवत्तापूर्ण कामकाजाचे तसेच गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांच्या उल्लेखनीय कामगिरीचे प्रसारण व प्रसिद्धी | रु. 3 लाख |
| 6 | पर्यावरण जतन | 1) हर्बल कॉर्नरची निर्मिती<br>2) प्लास्टिकमुक्त शाळा उपक्रमांतर्गत संकलित प्लास्टिक वस्तूंची वाहतूक करून केशवसृष्टी येथे पाठविणे<br>3) पावसाच्या पाण्याचे संकलन व साठवण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना | रु. 4 लाख |

सदर प्रस्तावामार्फत निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये दर्जेदार शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करुन विद्यार्थ्यांचा बौध्दिक शारीरीक, सामाजिक व वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे तसेच शाळांचा एकूण शैक्षणिक दर्जा उंचावणे हा प्रमुख उद्देश आहे. वाचनालय सुविधेमुळे विद्यार्थ्यांच्या वाचनाची आवड व सवय विकसित होण्यास मदत होईल. प्रयोगशाळा व व्हच्युअल लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊन प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षणास प्रोत्साहन मिळेल.

सदर प्रस्तावास शासन नियम व प्रचलित कार्यपद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करून आवश्यक साहित्य, उपकरणे व सेवा खरेदी कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांची दि. 29/09/2026 रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. शासन नियम व प्रचलित

Scanned with CamScanner

कार्यपद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रियेचा अवलंबून करुन आवश्यक साहित्य, उपकरणे व सेवा खरेदी/ कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे पाठविण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे. उक्त तक्त्यानुसार सदरचे साहित्य खरेदी करणेकामी रु २ करोड ५० लाख इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामी येणारा खर्च शासन निधीमधून अदा करण्यात येणार आहे. सबब सदरचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सादर करण्यासाठी मा. महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**(कविता बोरकर)**
**उपायुक्त (शिक्षण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.१५ / १० /२०२६ वेळ सा१५.००.१५
रजिस्टर नोंद अ.क्र. ८६ वर्ष २६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner